**मेहकर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी अ.अ. शेख )

केशव यादव तनपुरे .... वादी

विरुध्द

पवन साहेबराव तनपुरे व इतर ....प्रतिवादी

**तात्पुरता मनाई अर्ज नि.क्र.०५ खालील आदेश**

०१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अनुसार दाखल करुन प्रतिवादी क्र.६ तहसीलदार लोणार तथा मामलतदार कोर्ट यांनी रा.प्र.क्र. एम.सी.अॅक्ट–५/४२/वढव/२०२१–२२ मध्ये दिनांक २९.०८.२०२२ रोजी दिलेल्या निकालाची अंमलबजावणी करु नये तसेच प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी गटक्रमांक ६१८ मधील वादीच्या जमिनीतून नवीन रस्ता तयार करु नये, असा तात्पुरता मनाई आदेश या दाव्याचा निकाल होईपावेतो देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र.२३ अनुसार दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास विरोध दर्शवला आहे.

०३. उभय पक्षांचे कथन व दाखल कागदपत्रांवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले असून, त्यांचे निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीने प्रस्तुत अर्जासंदर्भात प्रथमदर्शनी पुरावा सादर केला आहे काय ? | .. होकारार्थी |
| २) | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | .. होकारार्थी |
| ३) | अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | .. होकारार्थी |
| ४) | कोणता आदेश ? | ..अर्ज मंजूर करण्यात आला. |

## का र ण मि मां सा

०४. वादीने प्रस्तुत अर्जातील कथनांच्या पृष्ठयर्थ स्वतःचे शपथपत्र दाखल करुन खालीलप्रमाणे कागदपत्र दाखल केले आहेत–

१. मामलतदार कोर्टाने दिनांक २९.०८.२०२२ रोजी दिलेल्या निकालाची प्रत,
२. उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी दिनांक १९.०५.२०२३ रोजी दिलेल्या निकालाची प्रत,
३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी मामलतदार कोर्टात दिनांक २९.३.२०२२ रोजी दिलेल्या अर्जाची प्रत,
४. दिनांक ९.५.२०२२ रोजीचा पंचनामा व अप्रमाणित रेखाचित्र,
५. गटक्रमांक ६१८ चा ७/१२ चा उतारा,
६. तहसीलदार लोणार यांनी दिनांक ८.८.२०२३ रोजी पोलिस निरीक्षक पोलिस ठाणे लोणार, मंडळ अधिकारी हिरडव व तलाठी वढव यांना पाठवून दिलेले पत्र,

०५. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांच्या लेखी कथनाच्या पृष्ठयर्थ शपथपत्रासह खालीलप्रमाणे कागदपत्र दाखल केले आहेत.

१. दिनांक ०४.०१.२०१३ रोजीच्या दोन खरेदीखताच्या प्रती.

०६. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तवाद ऐकण्यात आला. वादीच्या विधीज्ञांनी त्यांच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे न्यायनिवाडे सादर केले आहेत–

१) "गोरक्षण संस्थान, मूर्तिजापूर – विरुध्द – महाराष्ट्र शासन व इतर " रीट पिटीशन क्रमांक १९८२ /२०१७ मध्ये दिनांक २५.०४.२०१९ रोजी मा. उच्च न्यायालय मुंबई नागपूर खंडपीठ .
२) सुधीर यशवंत धनगडे –वि– अंकुश काशिराम बोले व इतर २०१९ (१) ऑल एम.आर. मा. उच्च न्यायालय मुंबई.
३) वासुदेव पंढरीनाथ रायकर –वि– मनोज मोहन दळवी २०१८ (४) एम.एल.जे. मा. उच्च न्यायालय मुंबई.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करीताः</u>–**

०७. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्याची चर्चा एकत्रीत करण्यात येत आहे. उभयपक्षांच्या लेखी कथनावरुन असे दिसून येते की, मौजे वढव, ता. लोणार येथील गटक्रमांक ६१८ मध्ये वादीच्या नावे ०३ हेक्टर ५८ आर जमीन असून सदर गटातील ०१ हेक्टर २१ आर जमीन प्रतिवादी क्र.१ याने दिनांक ०४.०१.२०13 रोजीच्या खरेदी खतान्वये वादी व विलासआप्पा विश्वनाथआप्पा चवरे यांच्याकडून ०१ हेक्टर ४५ आर जमीन खरेदी घेतली आहे. पुढे असेही दिसून येते की, गटक्रमांक ६१८ च्या लगत गटक्रमांक ६१७ असून सदर दोन्ही गटाच्या पश्चिम बाजूने शीवरस्ता आहे. गटक्रमांक ६१७ मध्ये देखील प्रतिवादी क्र.१ ची जमीन आहे. पुढे असेही दिसून येते की, मामलतदार कोर्टाने दिनांक २९.०८.२०२२ रोजी दिलेला निकाल उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी दिनांक १९.०५.२०२३ रोजी दिलेल्या निकालात कायम ठेवला आहे.

०८. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या कथनानुसार गटक्रमांक ६१८ पैकी ०१ हेक्टर ४५ आर खरेदी केलेल्या जमिनीत त्यांना जाणे येणे करिता मौजे वढव गावठाणातून गटक्रमांक ६१८ च्या उत्तरेकडील धु–याने पूर्वापार वहिवाटी रस्ता अस्तित्वात होता व आहे. प्रतिवादीनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठयर्थ दिनांक ०४.०१.२०१३ रोजीचे खरेदीखताची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. सदर खरेदी खतातील मजकुराचे अवलोकन केले असता "सदर शेतजमिनीस जाणे येणे साठी वहिवाटी प्रमाणे रस्ता आहे " असा मजकूर नमूद करण्यात आला आहे. परंतू, सदर खरेदीखतात प्रतिवादींनी खरेदी केलेल्या जमिनीस कोणत्या दिशेच्या धु–याने वहिवाटी रस्ता उपलब्ध आहे, याचा तपशील देण्यात आलेला नाही. याउलट, प्रथमदर्शनी असे दिसून येते की, गटक्रमांक ६१८ मधील प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या जमिनी लगत गटक्रमांक ६१७ मधील त्यांची जमीन असून सदर दोन्ही गटाच्या पश्चिम बाजूने लगत शीवरस्ता उपलब्ध आहे.

०९. "गोरक्षण संस्थान, मूर्तिजापूर – विरुध्द – महाराष्ट्र शासन व इतर " रीट पिटीशन क्रमांक १९८२ /२०१७ मध्ये दिनांक २५.०४.२०१९ रोजी मा. उच्च न्यायालय मुंबई नागपूर खंडपीठ यांनी दिलेल्या न्यायनिवाडयातील निष्कर्षानुसार मामलतदार कोर्ट अॅक्ट चे कलम ५ अनुसार वहिवाट दावा दाखल करतांना कलम ७ मधील तरतुदीनुसार वहिवाट दाव्यात संबंधीत पक्षकारांच्या जमिनीचा संपूर्ण तपशील चतुःसीमेसह तसेच वादग्रस्त रस्त्याचा तपशील नमूद करणे अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे वहिवाटी दाव्यासोबत स्वतःचे शपथपत्र / सत्यापन जोडणे देखील आवश्यक आहे. वर नमूद न्यायनिवाडयातील निष्कर्षाच्या अनुषंगाने

प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी मामलतदार कोर्टात दिनांक २९.०३.२०२२ रोजी दाखल केलेल्या वहिवाटी रस्ता अर्ज / दाव्याचे अवलोकन केले असता मामलतदार कोर्ट अॅक्ट कलम ५,७,८ व ९ मधील तरतुदींची पूर्तता प्रतिवादींनी केली नसल्याचे दिसून येत आहे. पुढे असे दिसून येते की, मामलतदार कोर्टाने वर नमूद तरतूदींची पूर्तता प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्याकडून करुन न घेता नियमबाहय निकाल दिलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांच्या अर्जात रस्त्याचा तपशील दिलेला नसतांना देखील मामलतदार कोर्टाने रस्ता तपशीलासह मंजूर केलेला आहे.

१०. पुढे रोजनाम्यातील नोंदीचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की मामलतदार कोर्टाने प्रतिवादी क्र.१ ते ३ व त्यांचे साक्षीदारांचा उलटतपास घेण्याची संधी वादीस दिलेली नाही. मामलतदार कोर्टाने वर नमूद कलमातील महत्वाच्या तरतुदीकडे दुर्लक्ष करुन नियमबाहय निकाल दिल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादीच्या जमिनीतील उत्तरेकडील धु–यावरुन प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा वहिवाटी रस्ता उपलब्ध असल्याबाबतचा प्रथमदर्शनी पुरावा त्यांनी न्यायालयासमोर सादर केलेला नाही. याउलट, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना त्यांच्या जमिनीत जाणे येणे करिता पश्चिम बाजूने शीवरस्ता उपलब्ध असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. दिनांक ०८.०८.२०२३ रोजी तहसीलदार लोणार यांनी पोलिस निरीक्षक व मंडळ अधिकारी यांना पाठवून दिलेल्या पत्रावरुन असे दिसून येते की, मामलतदार कोर्टाने दिनांक २९.०८.२०२२ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न करीत आहे. मामलतदार कोर्टाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाल्यास वादीच्या जमिनीचे व पिकाचे नुकसान होण्याची शक्यता

नाकारता येणार नाही. सबब, वादीने तात्पुरता मनाई आदेश मिळण्याकरिता योग्य तो प्रथमदर्शनी पुरावा न्यायालयात सादर केलेला आहे. तसेच दाखल कागदपत्रावरुन न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजूने असल्याचे दिसून येत आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज वादीच्या मागणीनुसार मंजूर होण्यास पात्र आहे. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.४ करीताचे निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आ दे श**

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.०५ मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादींना आदेशित करण्यात येते की रा.प्र.क्र. एम. सी. अॅक्ट–५/४२/वढव/२०२१–२२ मध्ये मामलतदार कोर्टाने दिनांक २९.०८. २०२२ रोजी दिलेल्या निकालाच्या आधारे गटक्रमांक ६१८ मधील वादीच्या मालकीच्या जमिनीतून नवीन रस्ता तयार करु नये किंवा वहिवाट करु नये, असा तात्पुरता मनाई आदेश या दाव्याचा निकाल होईपावेतो देण्यात येत आहे.

३. सदरचा दावा आजपासून चार (०४) महिन्याच्या आत निकाली काढणे कामी उभयपक्षांनी आपापला तोंडी व कागदोपत्री पुरावा नेमलेल्या तारखेस सादर करावा.

४. खर्चाबाबत हुकूम नाही.

स्वा/–
(अ.अ.शेख)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
मेहकर.

दिनांकः–१६/१२/२०२३.

I A.N.Vyawhare, Stenographer (Grade II) affirm that, contents of the PDF files are same words for words as per original.

Date of Judgment / order : 16.12.2023
Date of Uploading : 19.12.2023